**प्रेस नोट** **दि.१४/०३/२०१९**

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे

### बहीणीचे लग्नासाठी पैसे मिळविणेकरीता पुणे शहरात बँकांचे ए.टी.एम फोडण्याचा प्रयत्न करणा-या इसमास सतर्क मार्शलने घेतले ताब्यात

दिनांक १२/०३/१९ रोजी २१/०० वा.ते दि १३/०३/१९ रोजी सकाळी ०९/०० वा.पर्यन्त धानोरी बीट मार्शलचे पोलीस कर्मचारी पोशि ८१०२ खाडे व पोशि ७८१७ इथापे यांनी रात्र गस्ती दरम्यान दिनांक १३/०३/२०१९ रात्रौ ०२/३० वा. चे सुमारास पॅलेडीयम होम सोसा.धानोरी येथील गेटवर असणा-या रजि मध्ये सही करण्यासाठी जात असताना काशीगंगा सोसा.धानोरी पुणे येथील आय सी आय सी. आय. बँकेचे ए.टी.एम मध्ये त्यांना काहीतरी ठोकलेचा आवाज आल्याने त्यांनी थांबुन आतमध्ये पाहीले असता एक २५ ते ३० वयाचा इसम खाली वायर कापनेचे पक्कडने चे साहयाने ए.टी.एम मशीनचा खालील भागाचा पत्रा उचकटुन आतील भाग खोलण्याचा प्रयत्न करीत असलेचा दिसलेने त्यांनी प्रसंगावधान राखून लागलीच ए.टी.एम मशीनचा बाहेरील काचेचा दरवाजा दाबुन धरुन १०० नंबरला कॉल करुन पोलीस मदतीसाठी मागणी केली असता, विश्रांतवाडी पिटर मोबाईल वरील रात्र गस्त अधिकारी महिला पोलीस उप-निरीक्षक शुभांगी कामेगावकर व सोबतचा स्टाफ तसेच आळंदीरोड बीट मार्शल वरील कर्मचारी यांचे मदतीने त्यांनी ए.टी.एम फोडणारे इसमास ताब्यात घेऊन चौकशी करता त्याचे जवळ एक स्क्रु ड्रायव्हर, वायर कापण्याची कटर मशीन, त्याचा स्वतःचा जीओ कंपनीचा मोबाईल फोन मिळुन आला त्याने स्वतःचे नाव पत्ता विशाल रमाकांत चाबुकस्वार वय २१ वर्षे रा.मु.पो. निलंगा, शिवाजीनगर, ता.निलंगा, जि.लातुर मो.नं. ९२८४२३८९२६ असे असल्याचे सांगितलेने त्यास ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन येथे आणुन त्याचे विरुद्ध पोशि ८१०२ खाडे यांनी फिर्याद दिल्याने विश्रांतवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ८१/२०१९ भा द वि कलम ४५७, ३८०,५११,४२७ प्रमाणे गुन्हा नोंद करणेत आलेने दाखल गुन्हयात दिनांक १३/०३/२०१९ रोजी सकाळी ११/०० वाजता अटक करण्यात आली आहे. आरोपीकडे केल तपासात त्याने.१) शिवाजीनगर पो.टे.गु.र.नं.१७७/२०१९ भा द वि कलम ४५७,३८०,५११,४२७.२) खडकी पो.टे.गु.र.नं.९९/२०१९ भा द वि कलम ४५७,३८०,५११,४२७ असे गुन्हे केलेचे निष्पन्न झाले असून दाखल गुन्हयाचा तपास पथक अधिकरी पोलीस उप-निरीक्षक श्री.अभिजीत चौगुले हे करत आहेत.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त सो/पुर्व विभाग श्री सुनिल फुलारी सो यांच्या मार्गदर्शना खाली मा.पोलीस उप-आयुक्त श्री.प्रसाद अक्क्कानवरु, परिमंडळ ४ पुणे , मा.सहा.पोलीस आयुक्त,श्री.देविदास पाटील ,खडकी विभाग पुणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शना खाली म.पो.उपनिरीक्षक कामेगावकर ,पोलीस उप-निरीक्षक श्री.अभिजीत चौगुले पो.शि.वसुदेव खाडे ,पो शि गणेश इथापे,पो शि सोपान वाल्हेकर,पा`ना शंकर पाटील,पो शि मंगेश मोरे,सुरज खडके,होमगार्ड सातव यांनी केली आहे.